


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६१७ . वा | रविवार | दि. ०३ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# समृद्धीवर झालेल्या बस अपघाताला आले वेगळे वळण...

## १३ बळी घेणाऱ्या बसबाबत धक्कादायक महिती समोर...

**जनसंचलन/ बुलढाणा**

समृद्धी महामार्ग सुरू झाल्यापासून तो अपघातांमुळे सातत्याने चर्चेत आहे. दरम्यान, दोन महिन्यांपूर्वी १५ ऑक्टोबरला टेम्पो ट्रॅव्हलर खासगी बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला होता. या अपघातात १३ जणांचा बळी गेला. आता या अपघातातील खासगी बसबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. बसचा साटाच बनावट होता असा खुलासा झाला आहे. कालबाह्य झालेली बस मॉडीफाय करून वापरली होती. अपघातातील बसबाबत धक्कादायक माहिती समोर आल्यानंतर आता मालक आणि चालक या दोघांविरुद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातग्रस्त बस कालबाह्य झाली होती. त्या बसच्या चेसिस नंबरमध्ये बदल करण्यात आला होता. अशा प्रकारे सरकारची फसवणूक केल्या प्रकरणी आता वैजापूर पोलीसांनी मालक आणि चालकावर गुन्हा दाखल केला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सैलानी बाबाच्या दर्शनासाठी गेलेल्या भाविकांच्या भरधाव टेम्पो ट्रॅव्हलर बसने समृद्धी महामार्गावर ट्रकला धडक दिली होती. जांबरगाव शिवारात रस्त्यावर ट्रक उभा होता. या अपघातात १३ जण ठार तर २२ जण जखमी झाले होते. ट्रकला परिवहन विभागाच्या वाहन निरीक्षकांनी अडविल्याने तो थांबल्यानंतर हा अपघात झाल्याचे समोर आले होते. यापूकरणी दोन मोटार वाहन निरीक्षकांना निलंबित करण्यात आले होते. खासगी बसचा चालक आणि दोन



परिवहन अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# व्यंकटगिरीवर चार दिवस रंगणार ब्रह्मोत्सव...

## १६ ते १९ डिसेंबर दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम, उत्सवाची तयारी सुरु





**जनसंचलन/बुलढाणा**

शहरापासून जवळच असलेल्या आणि राजूर घाटातील व्यंकटगिरी पर्वतावर निसर्गाच्या कुशीत वसलेल्या बालाजी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ ते १९ डिसेंबर असे चार दिवस होम, यज्ञ आणि पूजा तसेच संगीत भजन व कीर्तन असे विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. ब्रह्मोत्सवाची जोरदार तयारी सुरु झाली आहे. मोठ्या भक्तीभावाने आणि जल्लोषात हा ब्रह्मोत्सव पार पडणार आहे. बालाजी सेवा समिती आणि बालाजी भक्त परिवारच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ब्रह्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. वर्षातून एकदा साजरा होणारा हा प्रमुख आणि सर्वात महत्वाचा उत्सव आहे. बालाजी मंदिरात नुकतीच नियोजनाची बैठक पार पडली. या बैठकीत ब्रह्मोत्सवाच्या तयारीबाबत चर्चा करुन विविध समित्या गठीत करण्यात आल्या. १६ डिसेंबर पासून ब्रह्मोत्सवाला सुरुवात होणार आहे. शनिवारी सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ५ ते ८ या वेळेत संकल्प, पुण्यवचन, यज्ञ शाळा प्रवेश आणि बालाजी परिक्रमा, रविवार, १७ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ५ ते ८ संकल्प, यज्ञ शाळा, महासुदर्शन होम व बालाजी परिक्रमा, सोमवार, १८ डिसेंबर रोजी सकाळी ७८ ते १२ संकल्प, पुण्यवचन, यज्ञ पूजन आणि बालाजी परिक्रम तर सायंकाळी ७ ते साडेआठ या वेळेत कल्याणोत्सव अर्थात श्रीदेवी व भुदेवी यांच्यासोबत बालाजींचा विवाह सोहळा पार पडणार आहे आणि त्यानंतर ८.३० ते १० वाजेपर्यंत महाप्रसाद वितरण होणार आहे. १९ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते १२ संकल्प, पुण्यवचन, १०८ कलश पुजन आणि पूर्णाहुती सोहळा होणार असून दुपारी १२.३० ते १ महाआरती होणार आहे. त्यानंतर काल्याचे कीर्तन व नंतर महाप्रसाद वितरणास सुरुवात होणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन बालाजी सेवा समितीचे अध्यक्ष अरुण दिवटे तसेच बालाजी भक्ताच्या वतीने करण्यात आले आहे. ब्रह्मोत्सवादरम्यान दररोज दुपारी २ ते ३ या वेळेत संगीत भजन रंगणार आहेत तर ३ ते ५ या वेळेत कीर्तन होणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज जन्म संस्थान आपेगाव, ता. पैठण. चे अध्यक्ष हभप. अध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर विष्णू महाराज, कोल्हापूरकर दादा हे कीर्तन सेवा देणार आहेत. तसेच काल्याचे कीर्तन देखील त्यांच्या अमृतवाणीतून होणार आहे. ब्रह्मोत्सवाच्या निमित्ताने पहिल्यांदाच हभप. ज्ञानेश्वर विष्णू महाराज यांचे कीर्तन श्रवण करण्याची संधी भाविकांना मिळणार आहे, हे विशेष.

# बुलढाणा जिल्ह्याचे लोकप्रिय दैनिक निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहारी जनसंचलनच्या विशेष दिपावली अंकाचे वाचक वर्गाच्या हस्ते विमोचन...












# जिल्ह्यात दुष्काळ व्यवस्थापनासाठी तातडीने उपाययोजना हाती घ्याव्यात–जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील




**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात यंदा सरासरी पर्जन्यमानात घट झाली असून, संभाव्य दुष्काळ व्यवस्थापन तातडीने उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे. यामध्ये जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आज येथे दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात दुष्काळ प्रतिबंधक उपाययोजनांसंबंधी आढावा बैठक घेण्यात आली. उपजिल्हाधिकारी (रोहयो) शरद पाटील, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी मनोज कुमार ढगे, जिल्हा जल संवर्धन अधिकारी अमोल मुंडे, रेशीम विकास अधिकारी व्ही. बी. ठाकरे, मृद व जलसंधारण विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, उप वन संरक्षक यांच्यासह संबंधित विभागप्रमुख उपस्थित होते. पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीमध्ये जिल्हा यंत्रणांनी सार्वजनिक कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सार्वजनिक कामांमध्ये वृक्ष लागवड, स्मशानभूमीची कामे, ग्रामपंचायत इमारत बांधकाम, शाळाच्या संरक्षक भिंती बांधकाम, पाणंद रस्ते, जलसंधारण, नाला खोलीकरण, गाळ काढणे यासह कृषी विभागातंर्गत कामे हाती घ्यावीत. जलस्त्रोतातील पाणीसाठा वाढविण्यासाठी गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविताना शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रयत्न करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिल्या. याशिवाय मनरेगा, मातोश्री पाणंद रस्ते, जलयुक्त शिवार योजना आदी योजनांतर्गत कामांचाही आढावा त्यांनी यावेळी घेतला. ग्रामपंचायतीच्या आवश्यकतेनुसार लोकोपयोगी कामांची निवड करून ती वेळेत पूर्ण करण्याकडे अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे. ग्रामपंचायत इमारत, समाज मंदिर, निवारा शेड, कम्युनिटी हॉल, किचन शेड, जलपुनर्भरण, वृक्ष लागवड, लोकश्रमदानातूनही कामे सुरु करावीत. वृक्षलागवड योजनेत बांबू लागवडीसाठी रोपांची वेळेत मागणी करावी. सामाजिक वनीकरण विभागाने वृक्षलागवडीचे नियोजन करून शासकीय विभागांना मागणीनुसार रोपांचा पुरवठा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिले. जलयुक्त शिवार योजना २.०, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला. पाणंद रस्त्याची कामे हाती घेण्यासाठी संयुक्त समिती स्थापन असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषदेकडे असलेल्या कामांचा वेळेत आढावा घेत ग्रामपंचायत पातळीवर कुशल आणि अकुशलमध्ये ही कामे करून घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिले. गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेतून कामे करताना सूक्ष्म नियोजन करून प्रकल्पातील गाळ काढण्याची प्रक्रिया वेगाने हाती घ्यावी. बीजेएस, नाम, आर्ट ऑफ लिव्हींग यासारख्या विविध स्वयंसेवी, सामाजिक संस्थांना सहभागी करून घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मृदा व जलसंधारण विभागासह कृषि विभागांचे शेततळे, सामूहिक शेततळे आदी जलसंधारणाची कामे तालुकानिहाय करावीत. मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून जिल्ह्यात जलसंधारणाची कामे हाती घेण्याच्या सूचना त्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

# राज्य शासनातर्फे लातूर, बुलढाणा, सांगलीत होणार क्रीडा स्पर्धा - क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

**वृत्तसंस्था/मुंबई**



राज्यात शासनातर्फे सन २०२३-२४ या वर्षात होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज करंडक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा लातूर येथे, छत्रपती शिवाजी महाराज करंडक व्हॉलिबॉल स्पर्धा बुलढाणा येथे, खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा लातूर येथे आणि भाई नेरुरकर राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा सांगली येथे होणार आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी ही माहिती दिली आहे. मंत्रालयातील दालनात विविध विषयांवर आज आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), आयुक्त सुहास दिवसे यांच्यासह मंत्रालयीन वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री. बनसोडे म्हणाले की, महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढीकरीता राज्यातील प्रतिभावंत खेळाडूंना खेळाकडे आकर्षित करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेतील प्रतिभावंत खेळाडूंना संधी मिळावी म्हणून स्पर्धाच्या आयोजनाकरिता शासनाने प्रति खेळ ७५ लाख रुपये एवढी तरतूद केली आहे. प्रतिखेळ ७५ लाख निधीमधून खेळाडू, मार्गदर्शक, व्यवस्थापक, पंच तथा तांत्रिक पदाधिकारी यांच्यासह खेळाडूंना रोख रकमेची बक्षिसे देण्यात येणार आहेत. स्थानिक आयोजन समितीस या स्पर्धाच्या आयोजनासाठी प्रति खेळ रु.७५.०० लाख उपलब्ध करुन देण्यात येणार असून यशस्वी आयोजनासाठी शासन निधी व्यतिरिक्त अधिक निधीची आवश्यकता भासल्यास आयोजन समितीस निधी उभारण्यास शासनाने मंजुरी दिली असल्याचे मंत्री श्री. बनसोडे यांनी सांगितले. सर्वसाधारण धोरण ठरविणे, सनियंत्रण करणे, स्पर्धास्थळ निश्चित करणे तसेच स्पर्धे साठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीचे गठन करण्यात आलेले आहे. या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक आयोजन समिती गठित करण्यात आली असून, संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कार्याध्यक्ष, संबंधित विभागाचे विभागीय उपसंचालक हे कोशाध्यक्ष, संबंधित खेळाच्या राज्य संघटनेचे सचिव हे आयोजन समितीचे सचिव आणि जिल्हा क्रीडा अधिकारी हे संयुक्त सचिव म्हणून काम पाहणार असल्याचे मंत्री श्री. बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अंत्री खेडेकर येथे सोमवारी डिजिटल मीडिया परिषद चिखली तालुका पत्रकार संघाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी, शिबिराचे आयोजन...

**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यातील अंत्रि खेडेकर येथे ०४ डिसेंबर २०२३ वार सोमवार मराठी पत्रकार परिषदेच्या ८५ वा वर्धापनदिन आहे. त्यानिमित चिखली तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने जिल्हातील सर्व पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सोमवारी (दि. ०४) सकाळी दहा वाजता, या शिबिराचे उद्घाटन चिखली तहसील चे तहसीलदार मा.कव्हळे साहेब, प्रमुख पाहुणे म्हणून अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार मा. विकास पाटील, चिखली तालुका कृषी अधिकारी माननीय ज्ञानेश्वर सवडदकर साहेब, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चिखली तालुका आरोग्य अधिकारी विशाल रेंगे साहेब, मराठी पत्रकार परिषद संलग्न डिजिटल मीडिया पत्रकार परिषद यांचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा जिल्हाध्यक्ष अनिलजी उंबरकर, जिल्हा संघटक नारायणजी दाभाडे, शेगाव तालुका मराठी पत्रकार परिषदेचे संघाचे सचिव नंदू कुलकर्णी, विभागीय सचिव अनिल राऊत यांच्या उपस्थितीत तज्ञ डॉक्टर व महिला डॉ. मार्गदर्शन व आरोग्य तपासणी करणार आहेत. तसेच नागरिकांचे राहिलेले आधार कार्ड अपडेट , भारत आयुष्यमान कार्ड, पी एम किसान योजना, यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावरील मार्गदर्शन प्रत्येक विभागाचे तज्ञ करणार आहेत. सर्व पत्रकार बंधू, भगिनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन डिजिटल मीडिया परिषद चिखली तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष व सर्व सन्माननीय पदाधिकारी यांनी केले आहे. आरोग्य शिबीरचे ठिकाण . प्राथमिक आरोग्य केंद्र अंत्री खेडेकर, तालुका चिखली, जिल्हा बुलढाणा रविवार दि .०४ डिसेंबर २०२३ रोजी सोमवार ला सकाळी १०ते दुपारी ०२ वाजे पर्यंत . तरी जास्तीत जास्त पत्रकारांनी व नागरीकांनी या रोग निदान शिबीरचा , आधार अपडेट, आयुष्यमान भारत कार्ड तसेच पीएम किसान योजनेचा




पत्रकार, दैनिक, साप्ताहिक, ऑनलाईन चॅनेलच्या सर्व पत्रकार बंधू, भगिनींनी व नागरीकांनी आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित राहून या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा वरील सर्व योजनेचा लाभ घ्यावा असे आ-वाहन मराठी पत्रकार परिषद सलग्न डिजिटल मीडिया परिषद चिखली तालुकाध्यक्ष सुनिल अंभोरे, उपाध्यक्ष कैलास देशमुख, सचिव एकनाथ माळेकर, सहसचिव भिकनराव भुतेकर, प्रसिद्धी प्रमुख कैलास आंधळे, कार्याध्यक्ष राधेश्याम काळे, कोषाध्यक्ष शेषराव जाधव तथा सर्व सन्माननीय तालुका पदाधिकारी यांनी केले आहे.


# शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या- रिपब्लिकन सेनेची मागणी

**जनसंचलन/ चिखली**



तालुक्यासह बुलढाणा जिल्ह्यामध्ये अवकाळी गारपीट पावसाने झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे दि.१ डिसेंबर २०२३ रोजी दिले बुलढाणा जिल्ह्यामध्ये अचानक अवकाळी पावसाने पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले तरी अधिकारी लवकर पंचनामे शेतकऱ्यांचे करत नाही काही भागात पंचनामे केली पण काही भागांमध्ये केलेच नाही शेतकऱ्यांचे नुकसानाचे पंचनामे अधिकारी यांना आदेश देऊन लवकरात लवकर करण्यात यावे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला असून शेतकऱ्यांच्या पिकांचे भाव सुद्धा मिळत नाही राज्य सरकार हे सुद्धा शेतकरी यांच्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे मुख्यमंत्री यांनी आदेश देउन शेतकऱ्यांचे पिकांचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी आणि शेतकरी यांच्यावर दरवर्षी काही ना काही नैसर्गिक संकटाने अडचणीत असतो त्याला न्याय राज्य सरकारने तात्काळ देण्यात यावे अन्यथा रिपब्लिकन सेनेच्या वतीने अगळे वे-गळे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा रिपब्लिकन सेनेच्या वतीने निवेदनामध्ये दिला आहे निवेदन दे-तेवेळी रिपब्लिकन सेनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष विजयकांत गवई, जिल्हा महासचिव सलीमभाई, शहर उपाध्यक्ष सतीश पवार, गोलू श्रीसागर हे होते

# बिबट्याचा शेतमजुरावर हल्ला जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू...



**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा तालुक्यातील देऊळघाट येथे शेतात मजुरावर बिबट्याचा हल्ला हल्ल्यात शेतमजूर जखमी देऊळघाट शहरातील घटना सविस्तर वृत्त अशे की, राजू बाबुराव सोनुने (वय३०रा बिरसिंगपूर या बुलढाणा) हे आज सकाळी ११ वाजेच्या सुमारास शेतात मध्ये जात होते.

बुलढाणा ते देऊळघाट मार्ग जवळ असलेल्या दलाल यांच्या शेत-ाजवळ एका बिबट्याने शेतमजुरावर हल्ला केला यात शेतमजूर जखमी झाला, मात्र राजू सोनुने यांनी आरडा ओरडा केल्याने शेतात काम करीत असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे धाव घेतली. आरडाओरडा च्या आ-वाजाने बिबट्याने त्या ठिकाणाहून पळ काढला जखमी राजू सोनवणे याला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती वन विभागाला मिळताच वन विभागाचे कर्मचारी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल झाले बुलढाणा वन परिषदेचे अधिकारी अभिजीत ठाकरे तात्काळ पथकासह घटनास्थळी दाखल झाले त्यांनी घटनेचा पंचनामा केला जखमी युवक सुखरूप असून त्याला प्राथमिक मदत देणार असल्याचे अभिजीत ठाकरे यांनी सांगितले

# भाजपा बुलढाणा शहराध्यक्षपदी अनंता शिंदे यांच्या निवडी बद्दल शिवालयात सत्कार...



**जनसंचलन/बुलडाणा**

भारतीय जनता पक्षाच्या शहराध्यक्ष पदाचा मागील तीन वर्ष पदाचा कार्यकाल संपुष्टात आल्याने बुलढाणा भाजपा शहराध्यक्षपदी नव्याने भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे यांनी एका नियुक्ती पत्राद्वारे श्री अनंता शंकरराव शिंदे यांची नियुक्ती केली आहे. आज दि. १ डिसेंबर २०२३ रोजी भाजपा लोकसभा निवडणुक प्रमुख मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालय शिवालय येथे स्व-ागत सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. अनंता शिंदे यांच्या नियुक्तीमुळे शहर भाजपामध्ये आनंदाचे वातावरण आहे. शिवालयात माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री अनंता शिंदे यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी बोलताना अनंता शिंदे यांनी झुंजणाऱ्या काळात शहरात सर्वांना सोबत घेऊन शहर भाजपामय करण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही उपस्थितांना दिली.

यावेळी भाजपा प्रदेश प्रतिनिधी श्री दिपकदादा वारे, कामगार मोर्चा जिल्हा सचिव विश्राम पवार, कामगार जिल्हा संयोजक श्री दत्ता शिंदे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ सिंधुताई खेडेकर,महिला जिल्हा सरचिटणीस सौ उषाताई पवार,महिला जिल्हा उपाध्यक्ष सौ अल्काताई पाठक,भाजयुमो तालुकाध्यक्ष श्री योगेश राजपूत, माजी नगरसेवक श्री अरविंद होंडे, श्री मंदार बाहेकर,सौ शोभाताई ढवळे, गजानन देशमुख, राजेश पाठक, श्री राजेंद्र पवार, संदीप वानेरे,सचिन शेळके, अमोल जाधव, संजय दसरकर, प्रदीप तोटे, अनिकेत गवळी, अशोक बाहेकर, श्री सतीश पाटील, प्रदीप सोनटक्के, पवन बगाडे, पप्पू सोनकर, संतोष पालकर यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बारामतीत लोकसभेला पवार विरुद्ध पवार सामना होईल का? शरद पवारांचं उत्तर...

**वृत्तसंस्था/पुणे**

अजित पवार यांनी लोकसभेच्या ४ जागा लढविणार असल्याचं जाहीर करतानाच बारामतीच्या जागेवर दावा सांगितला. त्याचवेळी बारामतीत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या सुप्रिया सुळे यांच्याविरोधात निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चाही आहेत. याच पार्श्वभूमीवर शरद पवार यांना बारामतीत पवार विरुद्ध पवार असा सामना रंगणार का? असा सवाल विचारण्यात आला. यावेळी त्यांनी अत्यंत खूबीने उत्तर देत मूळ प्रश्नाला बगल देण्याचा प्रयत्न केला. शरद पवार म्हणाले, पवार विरुद्ध पवार कसं होईल. वास्तविक बारामतीच्या खासदार या सुप्रियाताई सुळे आहे. आमच्या पक्षाचे अध्यक्ष ज्या उमेदवाराला तिकीट देतील तो निवडणूक लढवेल. शेवटी लोकशाही आहे. विरोधकांना त्यांची भूमिका घेऊन जनतेमध्ये जाण्याचा लोकशाहीनं अधिकार दिलेला आहे. लोकांना काय सांगायचं याची चिंता त्यांना आहे. त्यामुळे ते वारंवार आम्हीच राष्ट्रवादी असल्याचं सांगत आहेत. मात्र लोकांना सत्य माहीत आहे. त्यामुळे मतदान करताना शेवटी जनता काय निर्णय घ्यायचा ते ठरवेल.अजित पवार आणि त्यांच्या गटावर बोलताना शरद पवार म्हणाले, पक्ष सोडणारे पुन्हा विधानसभेत दिसत नाहीत, याची पुन्हा एकदा आठवण करुन दिली. त्याचबरोबर माझ्याबरोबर किती आमदार आहेत, ते आज सांगणार नाही. ते योग्यवेळी सांगणार नरेंद्र मोदी यांनी भर सभेत सिंचन घोटाळ्याचा उल्लेख केला होता. मोदींनी सिंचन घोटाळ्याचे हे आरोप नेमके कुणावर केले ते तुम्हीच शोधा, असा सूचक सवालही पवारसाहेबांनी पत्रकारांनाच केला. इंडिया बैठकीबाबत विचारलेल्या प्रश्नावर पाच राज्यांच्या निवडणुका झाल्या की दिल्लीत इंडियासंदर्भात बैठक होईल शरद पवार साहेब म्हणाले की, योग्य मागण्यांसाठी आंदोलन करायला काहीच हरकत नाही. मात्र राज्यात सामाजिक ऐक्य जतन केलं पाहिजे. जाती-जातीमध्ये अंतर वाढायला नको, ही आमची भूमिका आहे. आंदोलकांनी त्यांची भूमिका मांडावी. त्यातून जाती-जातीमध्ये तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत लोकांना आम्ही मतं मागितली होती ती मतं भाजपसोबत जाण्यासाठी नव्हती. ती एका विशिष्ट कार्यक्रमासाठी होती. एवढंच नाही तर भाजप आणि त्यांच्या विचारधारेविरोधात होती.



आमच्या भूमिकेला लोकांचा पाठिंबा होता म्हणून आमचे लोक निवडून आले. त्यामुळे जो कार्यक्रम मांडला, भूमिका मांडली त्याच्याविरुद्ध काही सूचविले असेल तर ती लोकांशी फसवणूक आहे. त्यामुळे ते करणे योग्य नाही अशी भूमिका माझ्यासह अनेक सदस्यांची होती, असे शरद पवार यांनी सांगितले.

# आत्या विरुद्ध भाचा संघर्ष पेटणार? बारामतीत सुप्रिया सुळेंविरोधात कोण?

## सुनेत्रा पवार की पार्थ पवार आत्याविरुद्ध भाच्याची चर्चा...

**वृत्तसंस्था/बारामती**

राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर राज्याच्या राजकारणात भूकंप झाला होता. त्यामुळे राष्ट्रवादीत दोन गट पडून शरद पवार गट आणि अजित पवार गट असे दोन गट पडले. त्यामुळे राज्याच्या राजकारणात पवार कुटुंब राजकीय दृष्ट्या वेगळे झाल्याचे पाहायला मिळाले. मात्र येणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी अजित पवार यांनी बारामती आणि शिरूर या दोन मतदार संघाची सद्या तरी निवड केली आहे.

मात्र आता बारामतीची चर्चा आता पुन्हा होऊ लागली आहे. कारण बारामती हा सुप्रिया सुळे यांचा मतदार संघ आहे. या मतदार संघात पवार विरुद्ध पवार अशी लढत पाहायला मिळू शकते. अजित पवार यांनी राष्ट्रवादीतून बाहेर पडत वेगळा गट निर्माण केला. त्यामुळे अनेक राजकीय समीकरणे बदलणार आहेत. मात्र बारामतीतून सुप्रिया सुळे यांच्या विरोधात नक्की कोण हा विषय आता चर्चेला आला आहे.कारण अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार देखील बारामतीमधून लोकसभेसाठी उमेदवारी घेण्याची शक्यता आहे. तसेच पार्थ पवार यांना देखील उमेदवारी दिली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अजित पवारांनी मंथन सभेत जरी बारामतीची घोषणा केली असली तरी अद्याप उमेवारीवर शिक्कामोर्तब झालेले नाही. याबाबत



येणाऱ्या काळात सर्व गोष्टी समोर येणार आहेत.

# पैशांसाठी विवाहितेचा सासरच्या मंडळीने केला छळ...

**जनसंचलन/ खामगाव**

पैशांसाठी विवाहितेचा सासरच्या मंडळीने छळ केला माहेरवरुन पैसे आण असा तगादा लावत सासरच्या लोकांनी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना अकोला येथे घडली. याप्रकरणी घारोड माहेर असलेल्या विवाहितेने हिवरखेड पोस्टेला तक्रार दिली असून त्यावरुन पतीसह सासरच्या लोकांविरुध्द हुंडाप्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबत सौ. नेहा योगेश जाधव वय २३ रा. अकोला ह. मु. घारोड हिने पोस्टेला तक्रार दिली की, तिला पतीसह सासरचे लोक ऐनकेन कारणाने त्रास देत होते. गर्भधारणा होत नाही या कारणावरुन नेहमी वाद घालायचे तसेच बुक स्टॉलच्या व्यवसायासाठी माहेरवरून ५० हजार रुपये घेवून ये, असे म्हणून छळत होते. याच कारणावरुन तिला माहेरी घारोड येथे पाठवून दिले-ले आहे. या तक्रारीवरून हिवरखेड पोलिसांनी पती यो-



गेश भिमराव जाधव याच्यासह भिमराव जाधव, शिला भिमराव जाधव, पुनम दिपक गवई व दिपक गवई यांच्याविरुध्द कलम ४९८ (अ) भादंवी सहकलम ४ हुंडाप्रतिबंधक अधिनियम नुसार गुन्हा दाखल केला आहे. पो-लीस पुढील तपास करीत आहेत.

बुलढाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलढाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

बॉक्स


वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत
जिल्हावासियांचा बुलंद आवाज
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...
व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी
8x8 cm
1 Month=5000/-
15 Day=3500/-
7 Day=2000/-
Hight 8 cm
Width 8 cm
5x8 cm
1 Month=3500/-
15 Day=2200/-
7 Day=1500/-
Hight 5 cm
Width 8 cm
5x8 cm
1 Month=3500/-
15 Day=2200/-
7 Day=1500/-
Hight 5 cm
Width 23 cm
एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.
One Day
Full Page=
8000/-
1/2 Page=
5000/-
2600/-
Hight 12 cm
Width 12 cm
1800/-
Hight 8 cm
Width 10 cm
1300/-
Hight 8 cm
Width 8 cm
T&C Apply
सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.
• जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
• पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
• प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल
विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील
न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये
अधिक माहितीसाठी संपर्क:
अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com